# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
# (सचिवालय)

**<u>प्रस्तावना</u> :-** नागपूर महानगरपालिका येथील निरुपयोगी संगणक (Computer e-waste) साहित्य निर्लेखित करण्याबाबत.
**{माहिती व तंत्रज्ञान विभाग}**

नागपूर महानगरपालिका मुख्यालय व झोन कार्यालयातील निरुपयोगी संगणक, लॅपटॉप, प्रिंटर, सर्वर व इतर सर्व माहिती तंत्रज्ञानाशी संबंधित उपकरणे निर्लेखन (विक्री) करावयाचे आहे.

महाराष्ट्र शासन सा.प्र.वि. शासन निर्णय क्र.मातंस /नस्ती 07/प्र.क्र.89/39, दि. 01/08/2011 मध्ये अंतर्भूत तरतूद क्र. 2 " संगणक, लॅपटॉप, प्रिंटर, सर्वर व इतर सर्व माहिती तंत्रज्ञानाशी संबंधित उपकरणे ज्यांचे वयोमान 5 वर्षे किंवा त्यापेक्ष्या जास्त झाले आहे अशी उपकरणे कालबाह्य झाल्याने निर्लेखित करण्यायोग्य ठरवण्यात यावीत" तसेच अंतर्भूत तरतूद क्र. 5 " कालबाह्य व निर्लेखित झालेल्या उपकरणाची विल्हेवाट लावण्यासाठी अपेक्षित किंवा (Upset Price) ठरवण्यासाठी उपकरणाच्या मूळ किंमतीतून दरवर्षी 60% (Written Down Value) या पद्धतीने घसारा कमी करून (Diminishing) किंमत काढण्यात येईल व काढण्यात आलेली किंमत नजीकच्या रु. 100/- च्या पूर्णांका एवढी धरण्यात यावी." अशी तरतूद आहे.

उपरोक्त शासन निर्णयानुसार, निर्लेखित करावयाचे साहित्य अंदाजे 07 वर्ष्या पूर्वी खरेदी केलेले जे आता उपयोगात नाही असे साहित्य निवडण्यात आले आहे. तसेच साहित्याच्या मूळ किंमतीतून दरवर्षी 60% घसारा कमी करून आलेली किंमत किंवा नजीकच्या रु. 100/- च्या पूर्णांका एवढी धरण्यात आलेली आहे. तसेच टोनर हे कन्झुमेबल असल्यामुळे त्याची किंमत 60% घसरा घेतल्यास त्याची किंमत 10-20 रु. पर्यंत येत असल्यामुळे त्यानुसार न घेता सरसकट 25/- रु घेण्यात आलेली आहे. त्यानुसार रु. 1,93,200/- चे प्राकलन तयार करण्यात आले आहे.

नागपूर महानगरपालिका कलम 79 नुसार, निर्लेखन करावयाच्या साहित्याचे मूल्य रु. 5000/- पेक्षा ज्यास्त असल्यामुळे म.न.पा. सभागृहाची मंजुरी आवश्यक आहे. परंतु सद्यास्थितीत महासभा अस्तित्वात नसल्यामुळे मा. आयुक्त तथा प्रशासक, मनपा, नागपूर यांच्या मंजुरीची आवश्यकता आहे. करिता प्राकलनामध्ये नमूद निरुपयोगी संगणक (Computer e-waste) साहित्याची ई-निविदा प्रक्रिया करून निर्लेखन (विक्री) करण्याचा प्रश्न विचारात घेणे.

## <u>पारीत ठराव</u>

**ठराव क्रमांक :- 99/मनपा/प्रशासक** **दिनांक :- 20/09/2022**

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार सहा. आयुक्त तथा संचालक, माहिती व तंत्रज्ञान विभाग यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार नागपूर महानगरपालिका येथील निरुपयोगी संगणक (Computer e-waste) साहित्य निर्लेखित करण्याबाबत.

नागपूर महानगरपालिका मुख्यालय व झोन कार्यालयातील निरुपयोगी संगणक, लॅपटॉप, प्रिंटर, सर्वर व इतर सर्व माहिती तंत्रज्ञानाशी संबंधित उपकरणे निर्लेखन (विक्री) करावयाचे आहे.

महाराष्ट्र शासन सा.प्र.वि. शासन निर्णय क्र.मातंस /नस्ती 07/प्र.क्र.89/39, दि. 01/08/2011 मध्ये अंतर्भूत तरतूद क्र. 2 " संगणक, लॅपटॉप, प्रिंटर, सर्वर व इतर सर्व माहिती तंत्रज्ञानाशी संबंधित उपकरणे ज्यांचे

वयोमान 5 वर्षे किंवा त्यापेक्ष्या जास्त झाले आहे अशी उपकरणे कालबाह्य झाल्याने निर्लेखित करण्यायोग्य ठरवण्यात यावीत"  तसेच अंतर्भूत तरतूद क्र. 5  " कालबाह्य व निर्लेखित झालेल्या उपकरणाची विल्हेवाट लावण्यासाठी अपेक्षित किंवा (Upset Price) ठरवण्यासाठी उपकरणाच्या मूळ किंमतीतून दरवर्षी 60% (Written Down Value) या पद्धतीने घसारा कमी करून (Diminishing) किंमत काढण्यात येईल व काढण्यात आलेली किंमत नजीकच्या रु. 100/- च्या पूर्णांका एवढी धरण्यात यावी." अशी तरतूद आहे.

उपरोक्त शासन निर्णयानुसार, निर्लेखित करावयाचे साहित्य अंदाजे 07 वर्ष्या पूर्वी खरेदी केलेले जे आता उपयोगात नाही असे साहित्य निवडण्यात आले आहे. तसेच साहित्याच्या मूळ किंमतीतून दरवर्षी 60% घसारा कमी करून आलेली किंमत किंवा नजीकच्या रु. 100/- च्या पूर्णांका एवढी धरण्यात आलेली आहे. तसेच टोनर हे कन्झुमेबल असल्यामुळे त्याची किंमत 60% घसरा घेतल्यास त्याची किंमत 10-20 रु. पर्यंत येत असल्यामुळे त्यानुसार न घेता सरसकट 25/- रु घेण्यात आलेली आहे. त्यानुसार रु. 1,93,200/- चे प्राकलन तयार करण्यात आले आहे.

नागपूर महानगरपालिका कलम 79 नुसार, निर्लेखन करावयाच्या साहित्याचे मूल्य रु. 5000/- पेक्षा ज्यास्त असल्यामुळे म.न.पा. सभागृहाची मंजुरी आवश्यक आहे. परंतु सद्यास्थितीत महासभा अस्तित्वात नसल्यामुळे मा. आयुक्त तथा प्रशासक, मनपा, नागपूर यांच्या मंजुरीची आवश्यकता आहे. करिता प्राकलनामध्ये नमूद निरुपयोगी संगणक (Computer e-waste) साहित्याची ई-निविदा प्रक्रिया करून निर्लेखन (विक्री) करण्याच्या प्रस्तावास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**हस्ता/-**
**राधाकृष्णन बी. (भा.प्र.से.)**
**प्रशासक**
**नागपूर महानगरपालिका, नागपूर**